17 JUL 2023 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण एमबीए, रसायनशास्त्र अधिविभागात आज प्रवेश प्रक्रिया

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागात दुसरी प्रवेश फेरी, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया फेरी आयोजित करण्यात आली आहे. विद्यापीठातर्फे यापूर्वी, शनिवारी रसायनशास्त्र अधिविभागात दुसरी प्रवेश फेरी आयोजित करण्यात आली होती; परंतु काही तांत्रिक कारणास्तव दुसऱ्या फेरीची प्रवेश प्रक्रिया सोमवारी होणार असल्याचे अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी सांगितले. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) अभ्यासक्रमासाठी घेतलेल्या प्रवेश परीक्षेनुसार विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया फेरी सोमवारी सकाळी नऊ वाजता होणार असल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

पुढारी

# लोकसंख्या नियंत्रणासाठी जनजागृती करणे आवश्यक : प्रा. जाधव

कोल्हापूर : भारतातील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. लोकसंख्या नियंत्रण करण्यासाठी कायदा करण्यापेक्षा जनजागृती करणे, लोकांना चांगले आरोग्य, शिक्षण सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अभ्यासमंडळाचे सदस्य प्रा. डॉ. रत्नदीप जाधव यांनी केले. विवेकानंद महाविद्यालयात भूगोल, समाजशास्त्र, अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ऑनलाईन व्याख्यानात बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. प्रास्ताविक भूगोल विभाग प्रमुख डॉ. जी. एस. उबाळे यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रा. आण्णासाहेब वसेकर यांनी करुन दिली. प्रा. एच. व्ही. चामे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. शुभांगी काळे यांनी केले. यावेळी डॉ. श्रुती जोशी, डॉ. कैलास पाटील, डॉ सोमनाथ काळे, डॉ. सुनील भोसले, डॉ. धीरज पाटील, डॉ. निशा मुगडे, डॉ. सिद्धार्थ घोडेराव उपस्थित होते.

सकाळ

# डॉ. अविराज कुलदीप यांना स्वच्छता सारथी फेलोशीप



डॉ. अविराज कुलदीप

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. अविराज कुलदीप यांना स्वच्छ भारत उन्नत भारत योजनेअंतर्गत भारत सरकारच्या प्रधान वैज्ञानिक सल्लागार कार्यालयाकडून 'स्वच्छता सारथी फेलो' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. देशभरातील ३६ राज्यांमधून १२५ फेलोंची निवड करण्यात आली आहे.

प्रकल्पाअंतर्गत डॉ. कुलदीप कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदीमधील पाण्याचे प्रदूषण व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय यावर संशोधन करण्यासाठी सेमीकंडक्टर फोटो कॅटलिस्टचा वापर करणार आहेत.

'वेस्ट टू वेल्थ मिशन' पंतप्रधानांच्या विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम सल्लागार परिषदेच्या नऊ वैज्ञानिक मोहिमांपैकी एक आहे. भारत सरकारच्या प्रधान वैज्ञानिक सल्लागारच्या कार्यालयाद्वारे मिशनचे नेतृत्व केले जाते. मिशनचे उद्दिष्ट कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी तंत्रज्ञान ओळखणे, विकसित करणे आणि उपयोजित करणे, ऊर्जा निर्माण करणे, सामग्रीचे पुनर्वापर करणे आणि मूल्यवान संसाधने काढणे हे आहे.

स्वच्छ आणि हरित वातावरण निर्माण करण्याचे वचन देणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासाला ओळखण्यासाठी आणि त्यांना पाठिंबा देण्यासाठी देखील मिशन कार्य करते. देशातील कचरा हाताळणी सुव्यवस्थित करण्यासाठी कचरा व्यवस्थापनासाठी आर्थिकदृष्ट्या सक्षम असे आर्थिक मॉडेल तयार करण्यासाठी मिशन विज्ञान, तंत्रज्ञान आंणि नवकल्पना वापरून स्वच्छ भारत आणि स्मार्ट सिटीं प्रकल्पांना मदत करण्यास तत्पर आहे. फेलोशीप अंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील पाण्याचे प्रदूषण मुख्यत्वे करून पंचगंगा नदी त्याची कारणे व त्याच्यावर प्रतिबंधात्मक उपाय यांसाठी सेमीकंडक्टर फोटो कॅटलिस्टचा उपयोग याविषयी कार्य करण्यात येणार आहे.

तरुण भारत

# डॉ. अविराज कुलदीप यांना स्वच्छता सारथी फेलोशिप

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागातील हंगामी प्राध्यापक डॉ. अविराज कुलदीप यांना स्वच्छ भारत उन्नत भारत योजनेअंतर्गत भारत सरकारच्या प्रधान वैज्ञानिक सल्लागार कार्यालयाकडून स्वच्छता सारथी फेलोशिप मिळाली आहे. देशभरातील ३६ राज्यांमधून १२५ फेलोंची निवड करण्यात आली आहे. या प्रकल्पाअंतर्गत डॉ. कुलदीप कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदीमधील पाण्याचे प्रदुषण व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय यावर संशोधन करण्यासाठी सेमीकंडन्टर फोटो कॅटलिस्टचा वापर करणार आहेत.



वेस्ट टू वेल्थ मिशन हे पंतप्रधानांच्या विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम सल्लागार परिषदेच्या नऊ वैज्ञानिक मोहिमांपैकी एक आहे. मिशनचे उद्दिष्ट कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी तंत्रज्ञान ओळखणे, विकसित करणे, उर्जा निर्माण करण्याचे वचन देणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानांच्या विकासाला ओळखण्यासाठी आणि त्यांना पाठींबा देण्यासाठी हे मिशन कार्य करते.

- **पंचगंगा पाणी प्रदुषण व उपाय यावर संशोधन**

'पंचगंगा" नदी ही महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर आणि इचलकरंजी शहराची जीवनरेखा मानली जाते. परंतू मानवी हस्तक्षेपामुळे औद्योगिक सांडपाणी विशेषतः रंग उद्योगांचे प्रक्रिया केलेले पाणी थेट या नदीत मिसळते. यावर्षी मार्च महिन्यात जलप्रदूषणामुळे पाणी इतके दूषित होते, की ते पिण्यासाठी अयोग्य होते, या फेलोशीप अंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील पाण्याचे प्रदूषण मुख्यत्वे करून पंचगंगा नदी त्याची कारणे व त्याच्यावर प्रतिबंधात्मक उपाय यासाठी सेमीकंडक्टर फोटो कॅटलिस्टचा उपयोगा विषयी कार्य करण्यात येणार आहे. स्वच्छ भारत उन्नत भारत मिशन अंतर्गत डॉ. कुलदीप यांनी निवड झाल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. के. डी. सोनवणे यांनी अभिनंदन केले. या प्रकल्पासाठी डॉ. के. एम. गरडकर, डॉ. पोरे, डॉ. राशिनकर, डॉ. तायडे, डॉ. माने यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत

# दूरशिक्षण एमबीए, रसायनशास्त्रच्या प्रवेशाला आज प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागाची दुसरी प्रवेश फेरी आणि दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एम.बी.ए.(डिस्टन्स मोड) विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रिया फेरी आज सोमवार रोजी होणार आहे. यापूर्वी शनिवारी रसायनशास्त्र अधिविभागाची दुसरी प्रवेश फेरी आयोजित केली होती. परंतु काही तांत्रिक कारणास्तव आज (दि. १७) दुसऱ्या फेरी होणार आहे, असे अधिविभागप्रमुख डॉ. के. डी. सोनवणे यांनी सांगितले.